
प्रजावाणी 29/03/2025

# परभणी पोलिसांचा वॉन्टेड आरोपी नांदेड 'एलसीबी'च्या जाळ्यात

## पंधरा वर्षांपासून होता फरार

**नांदेड (प्रतिनिधी)**– परभणी जिल्ह्यात गंभीर गुन्हे करून मागील पंधरा वर्षांपासून फरार असलेला आरोपी नांदेडच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात अडकला. पोलिसांनी त्याला अटक करून परभणी शहरातील कोतवाली पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत माली गुन्ह्यातील आरोपीतांची माहिती काढून कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना आदेशीत केले होते. त्यावरून पोलीस निरीक्षक स्था.गु.शा खंडेराय यांनी सहायक पोलीस निरीक्षक रवी वाव्हुळे व त्यांच्या पथकातील अंमलदार यांना आदेशीत केले होते.



दि.२७ मार्च रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक वाव्हुळे व त्यांच्या पथकातील अंमलदारांना परभणी येथून १५ वर्षापुर्वी फरार झालेला आरोपी पंडीतसिंग धरम सिंग जुन्नी ऊर्फ राहुल बादल बंजारा हा वजिराबाद परिसरात आला असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यावरून आरोपीचा गुरूव्दारा गेट नं ०६ शहिदपुरा, नांदेड येथे शोध घेतला असता पंडीतसिंग धरमसिंग जुन्नी ऊर्फ राहुल बादल बंजारा (वय ५० वर्ष, रा.तलाब कट्टा परळी जि.बीड ह.मु. इंदरा कॉलनी भदारलौ ता: राणी जिल्हा पाली राज्य राजस्थान) हा आढळून आला. सदर कुख्यात आरोपी पंडीतसिंग धरमसिंग जुन्नी ऊर्फ राहुल बादल बंजारा याच्यावर वेगवेगळ्या राज्यात माली गुन्हे दाखल आहेत. या आरोपीला १५ एप्रिल २०१० रोजी बीड येथून परभणीकडे नेले जात असतांना बीड पोलिसांच्या ताब्यातून पळून गेला होता.

सदर प्रकरणी पो.स्टे. कोतवाली जिल्हा परभणी येथे गु.र.नं. ७३/२०१० कलम २२३,२२४ भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सुमारे १५ वर्षापासून फरार असलेला कुख्यात आरोपी पंडीतसिंग धरमसिंग जुन्नी ऊर्फ राहुल बादल बंजारा यास सहा. पोलीस निरीक्षक आर. व्ही. वाहुळे व त्यांचे पथकातील अंमलदार यांनी पकडून कोतवाली पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले.